Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing… Date: 12/08/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## खगोलशास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई

डॉ. विक्रम साराभाई हे भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ होते. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'ची मुहूर्तमेढ डॉ. विक्रम साराभाई यांनी रोवली. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी गुजरातमधील अहमदाबाद याठिकाणी झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण तिथेच झाले. गणित, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र यांमध्ये विशेष आवड असल्याने त्यांनी पुढील शिक्षणासाठी १९३७ मध्ये ब्रिटन गाठले, मात्र त्याचवेळी दुसरे महायुद्ध ऐन भरात होते. त्यामुळे तिथून ते पुन्हा मायदेशी परतले. भारतात आल्यानंतर त्यांनी बंगळुरूतील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्समध्ये संशोधनास सुरुवात केली. १९४७ मध्ये दुसरे महायुद्ध संपले आणि ते पुन्हा ब्रिटनमध्ये गेले. तिथे त्यांनी कॉस्मिक रे इनव्हेस्टिगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युड्स या विषयात संशोधन करून डॉक्टरेट मिळवली. ब्रिटनमधून परतल्यानंतर त्यांनी ११ नोव्हेंबर १९४७ रोजी फिझिकल रिसर्च लॅबची स्थापना केली.

केरळमधील थुंबा येथे लाँचपॅड निश्चित करण्यात आले होते. तिथेही अनेक लहान-मोठ्या अडथळ्यांना त्यांना सामोरे जावे लागले. या सगळ्यावर मात करत रॉकेटचे प्रक्षेपण करण्यात आले. संयुक्त राष्ट्राने पुढे या केंद्राला आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून मान्यता दिली. पुढे भारताने या केंद्राला डॉ. विक्रम साराभाई यांचेच नाव दिले. अवकाश संशोधनासाठी भारत सरकारने १९६२ साली समिती नेमली. अर्थात, या समितीचे नेतृत्त्व डॉ. विक्रम साराभाई यांनीच केले. १९६९ मध्ये याच समितीच्या शिफारशीतून 'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात 'इस्रो'ची स्थापना करण्यात आली. इस्रोने पुढे अवकाश संशोधन क्षेत्रात भारताचे नाव अमेरिका, रशिया यांसारख्या प्रगत देशांच्या यादीत नेऊन ठेवले. अशा या महान शास्त्रज्ञाचे ३० डिसेंबर १९७१ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Aug 12, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING